# राष्ट्रीय आरोग्य अभियान जाहिरात सन २०२४-२५

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंबकल्याण सोसायटी रत्नागिरी

रत्नागिरी जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंबकल्याण सोसायटी यांचेतर्फे उमेदवारांकडुन निव्वळ करार तत्वावर खालील पदांसाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. पदभरती प्रक्रिया कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर राबविण्यात येत असून, खालील तक्त्यानुसार पात्र असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचे अर्ज टपालाने किंवा प्रत्यक्ष जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, जि.प.रत्नागिरी या कार्यालयाकडे सादर करावे.

| क्र. | पदाचे नांव | कार्यक्रमाचे नाव | पदस्थापनेचे ठिकाण | पात्रता | अनुभव | पदांची संख्या | आरक्षणानुसार भरावयाचे पद | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | District Epidemiologists | IDSP | District Health Office, Ratnagiri | MBBS/ any Medical Graguate with MPH/MHA/ MBA in Health | Minimum 1 Year of Experience | 1 | OPEN | 35,000/- |
| २ | District Programme Coordinator-RNTCP | NTEP | DTO Office | MBBS/ any Medical Graguate with MPH/MHA/ MBA in Health | Minimum 1 Year of Experience | 1 | OPEN | 35,000/- |
| ३ | District Consultant-NTCP | NTCP | District Hospital, Ratnagiri | MBBS/ any Medical Graguate with MPH/MHA/ MBA in Health | Minimum 1 Year of Experience | 1 | OPEN | 35,000/- |
| ४ | CPHC Consultant | HWC | District Hospital, Ratnagiri | MBBS/ any Medical Graguate with MPH/MHA/ MBA in Health | Minimum 1 Year of Experience | 1 | OPEN | 35,000/- |
| ५ | Public Health Specialist | 15 FC | Mandangad 1, Guhagar 1, Khed 1, Rajapur 1, Dapoli 1, Chiplun 1, Sangameshwar 1, Lanja 1 | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | Nil | 8 | SC-1, ST-1, VJA-1, OBC-1, EWS-1, OPEN-3 | 35,000/- |
| ६ | Budget and Finance Officer | FMG | District Health Office, Ratnagiri | CA/Inter CA/ICWA/Inter ICWA or MBA (Finance)with Graduate in Commerce or M.com(with TALLY) | Minimum 3 Year Exp for those holding only B.COM Degree | 1 | OPEN | 20,000/- |

| क्र. | पदाचे नांव | कार्यक्रमाचे नाव | पदस्थापनेचे ठिकाण | पात्रता | अनुभव | पदांची संख्या | आरक्षणानुसार भरावयाचे पद | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | Accountant | FMG | District Health Office, Ratnagiri | B.Com with Tally Certification | Minimum 3 Years of Experience | 1 | ST | 18000/- |
| ८ | Psychatric Nurse | NMHP | District Hospital, Ratnagiri | GNM / B.Sc with certification in Psychiatry from reputed institute OR DPN OR M.Sc Nursing (Psy) | NIL | 1 | OPEN | 25000/- |
| ९ | Medical Officer Ayush (PG) | AYUSH | District Hospital, Ratnagiri | PG Unani | 2 years experience in Ayush Hospital | 1 | SC | 30000/- |
| १० | Medical Officer Ayush (UG) | AYUSH | RH | BAMS | Nil | 1 | OBC | 28000/- |
| ११ | Medical Officer MBBS | 15 FC | | MBBS | NIL | 8 (संभाव्य रिक्त पदे) | ST 1, SBC 1, NT B, EWS 2, OPEN 3 | MBBS - 60000/- |
| १२ | Medical Officer Ayush Male | RBSK | Guhagar 2, Rajapur 2 | BAMS | NIL | 4 | SC 1, ST1, EWS 1, SEBC 1 | 28000/- |
| १३ | Medical Officer Ayush Female | RBSK | Guhagar 2, Khed 1 | BAMS | NIL | 3 | VJ A 1, EWS 1, SEBC 1 | 28000/- |
| १४ | IPHS Coordinator | IPHS | District Hospital, Ratnagiri | Graduation in Biomedical Engineer | Nil | 1 | OPEN | 25000/- |
| | एकूण पदे | | | | | 25 | | |

रील प्रमाणे मंजूर पदे असलेल्या निव्वळ कंत्राटी पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्रांच्या छायांकित केलेल्या स्वसाक्षांकित प्रतीसह उपरोक्त नमुद केलेल्या मंजूर पदासाठी अर्ज स्विकारण्याची मुदत दि. १९.१२.२०२४ पासून ते दि. ३१.१२.२०२४ रोजीपर्यंत सकाळी १०.०० ते ५.३० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) आहे. तसेच दि ३१.१२.२०२४ नंतर आलेल्या उमेदवारांचा अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. इमेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही. पदभरती जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हयाच्या संकेतस्थळावर https://ratnagiri.gov.in & https://zpratnagiri.org प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच पदभरती विषयक पुढील सुचनाही याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येतील. याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**सुचना**

**:**

१) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत. सदर पदावर कायमपणाचे हक्क राहणार नाहीत. तसेच अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किवा त्यासंबंधीचा दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

२) निवड झालेल्या उमेदवाराला ११ महिने २९ दिवसाकरीता कंत्राटी पद्धतीने नेमणूक देण्यात येईल.

३) निवड झालेल्या उमेदवारांना समितीने तयार केलेल्या अटी व शर्ती मान्य कराव्या लागतील तसेच रु.१००/- च्या बॉण्डपेपरवर करारनामा सादर करावा लागेल.

४) अनुभवासंबंधी प्रमाणपत्र जोडले नसल्यास अनुभव ग्राहय धरला जाणार नाही.

५) **वयोमर्यादा** - सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय,मुंबई यांचे दि. २५.०४.२०१६ चे शासन निर्णयानुसार अर्ज करण्याच्या अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी नसावे व कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्त नसावे. १) एमबीबीएस, विशेषतज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषतज्ञ या पदाची कमाल वयोमर्यादा ७० वर्षे २) वैदयकीय अधिकारी, स्टाफ नर्स, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषधनिर्माता या पदाची कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे ३) इतर पदे खुल्या प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे व राष्ट्रीय आरोग्य अधिकारी अंतर्गत कर्मचाऱ्यांसाठी ५ वर्षे शिथिल.

६) सदरहु जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

७) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी रत्नागिरीच्या एनआयसीच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत येईल.

८) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

९) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

१०) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही काणेताही दावा करता येणार नाही.

११) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दि.०१.०७.२००५ च्या शासन निर्णयानुसार लहान कुटुंबाची अट लागु करणेत आली असुन, अर्जाच्या नमुन्यासोबत जोडण्यात आलेले लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक राहील.

१२) अर्जदार हा शारीरिक व मानसिक दृष्या सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा अश्या आशयाचे चारित्र्याचे प्रमाणपत्र १ महिन्याच्या कालावधीत सादर करणे बंधनकारक राहिल.

१३) राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेश्या प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या ठिकाणी भरतीची आवश्यकता घेवून व राष्ट्रीय आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविण्याचे अभियान आहे ही बाब लक्षात घेवून प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल

**आवश्यक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती -**

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची मार्कशिट व प्रमाणपत्रे (सेमिस्टर पॅटर्न असणाऱ्या उमेदवाराने अर्जावरती मार्क्स नमुद करताना सरासरी गुण नमुद करावे.)

२) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला.

३) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र

४) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

५) जात प्रमाणपत्रची सांक्षाकिंत प्रत

**अर्ज**

१) इच्छुक उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्याता ए ४ आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर एका बाजुस टंकलिखीत अथवा मुद्रीत करुन सुवाच्य अक्षरात भरलेला अर्ज सादर करावा.

२) लिफाफयावर पदाचे नाव व युनिटचे/कक्षाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

३) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१५०/- व मागास प्रवर्गासाठी रु.१००/- (नापरतावा) अर्ज शुल्क भरणे आवश्यक आहे. अर्ज शुल्क हे ऑनलाईन पध्दतीने (फोन पे/जीपे/युपीआय/इंटरनेट बँकिंग/मोबाईल बँकिंग) ने खाते क्रमांक **11149266074** स्टेट बँक ऑफ इंडिया **District Integrated Health & family welfare Society Ratnagiri** आयएफएससी कोड **SBIN0000467** मध्ये भरणा करुन त्याचा **UTI/UTR Transaction No.** अर्जामध्ये स्पष्ट नमुद करणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्यक्ष अर्जासोबत ऑनलाईन भरणा केलेल्या रक्कमेची पावती जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा अर्ज अपात्र करण्यात येईल.

४) उमेदवारांनी **दि.३१/१२/२०२४** पर्यंत कार्यालयीन वेळेच्या आत सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज आवश्यक गुणपत्रांच्या व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, जि.प.रत्नागिरी यांचे कार्यालयात प्रत्यक्ष किंवा टपालाने पोहोच करणे गरजेचे आहे.

**खालील उणिवा असलेले अर्ज नाकारण्यात येतील :**

१) विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज.

२) विहित नमुन्यात नसलेले किंवा योग्य प्रकारे न केलेले अर्ज.

३) मजकूर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज, खाडाखोड केलेला अर्ज.

४) स्वाक्षरी नसलेले, आवश्यक गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती नसलेले अर्ज अगर तत्सम माहिती योग्य रित्या न दर्शविलेले अर्ज.

वरीलप्रमाणे कोणत्याही बाबतीत त्रुटी असल्यास आपला अर्ज नाकारण्यात येईल व त्याबाबतीत आपल्याशी कोणताही पत्रव्यवहार केला/ स्विकारला जाणार नाही.

टिप : उपरोक्त पदसंख्येत बदल करणे तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत.

(डॉ.अनिरुद्ध आठल्ये)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, रत्नागिरी
तथा सदस्य सचिव
जिल्हा स्तरीय पदभरती समिती
रत्नागिरी

(श्री. किर्ती किरण पुजार)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी
तथा अध्यक्ष
जिल्हा स्तरीय पदभरती समिती
रत्नागिरी